बंधपत्रित आरोग्य सेविका(ए.एन.एम.)
यांच्या सेवा नियमित करणे बाबत.

**जिल्हा परिषद अहिल्यानगर,**
**आरोग्य विभाग**
**जिल्हा परिषद आदेश क्र.आरोग्य/कार्या-२आस्था-४/ ८६ /२०२६**
**दि. १८ /०१/२०२६**

**वाचा** – १. महाराष्ट्र शासन,ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्र.संकीर्ण-२००८/प्र.क्र.११९/आस्था-८, दि.०२.०५.२००९
२.महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.डीईएन-२०१८/प्र.क्र.३९/आस्था-१२, दि.५.५२०१८
३. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाकडील, शुध्दीपत्रक क्र.डीईएन-२०१८/प्र.क्र.३९/आस्था-१२, दि.२८.५.२०१९
४.श्रीमती शारदा सखाराम खताळ व इतर विरुध्द रिट याचिका क्र.२८७/२०२४
५. मा उच्च न्यायालयाचा दिनांक १०.०६.२०२४ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने अवमान याचिका क्र.३८१/२०२५
६. महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक-डीईएन-२०२५/प्र.क्र.५६/आस्था-१२,दि.५.१.२०२६

**-आदेश –**

वरील संदर्भ क्र.१ ते ३ नुसार दि.१५ एप्रिल २०१५ पुर्वी नियुक्त झालेल्या संबंधित बंधपत्रित आरोग्य सेविका (ए.एन.एम.) यांच्या सेवा नियमित न झाल्याने संदर्भ क्रमांक ४ व ५ अन्वये मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे सेवा नियमित करणेबाबत रिट याचिका व अवमान याचिका दाखल करणेत आलेली होती. सदर प्रकरणी शासनाचे संदर्भ क्रमांक १,२ व ३ अधिक्रमित करुन संदर्भ क्रमांक ६ नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना दि.१५. एप्रिल २०१५ पुर्वी नियुक्त बंधपत्रित आरोग्य सेविकास महिला (ए.एन.एम). यांच्या सेवा नियमित करणेबाबतचे अधिकार प्रदान करणेत आलेले आहेत.

सबब, संदर्भ क्रमांक ६ अन्वये परिशिष्ठ-अ मध्ये नमुद केलेनुसार व मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील यादीमधील ०५ (पाच) आरोग्य सेविका (ए.एन.एम.) यांच्या सेवा त्यांच्या कामावर हजर होण्याचे दिनांकापासुन नियमित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. संबंधित आरोग्य सेविकेचा तांत्रिक खंड हा देय अनुज्ञेय रजा म्हणुन मंजुर करण्यात यावा.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव | सेवा नियमित दिनांक |
|---|---|---|
| १ | श्रीमती.शारदा सखाराम खताळ | १०/०४/२००६ |
| २ | श्रीमती.जयश्री पांडुरंग पोजगे | १२/०४/२००६ |
| ३ | श्रीमती.राणी पोपट लोंढे | १५/०४/२००६ |
| ४ | श्रीमती.रंजना माधवराव पांडे | १०/०४/२००६ |
| ५ | श्रीमती.सिमा मंगा सोनवणे | १०/०४/२००६ |

सदर आदेशाची नोंद सर्व संबंधितांचे मुळसेवा पुस्तकात घेण्यात यावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल इकडेस सत्वर सादर करावा.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या **WWW.nagarzp.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्रमांक 202601191000010 असा आहे.

(आनंद भंडारी, भाप्रसे)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

**प्रति,** सर्व संबंधित आरोग्य सेविका
द्वारा वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र संबंधित
**प्रत –** वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र ---------------तालुका ------------ जिल्हा अहिल्यानगर
२/- सदर आदेशाची एक प्रत संबंधितास बजावुन दुस-या प्रतीवर दिनांकित स्वाक्षरी घेऊन पोहोच या कार्यालयास पाठविण्यात यावी व सदर आदेशानुसार उचित कार्यवाही करणेत येऊन अहवाल सादर करण्यात यावा.
**प्रत माहितीस्तव सविनय सादर,**
१.मा.उप सचिव, महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन,२५,मर्झबन पथ, फोर्ट, मुंबई-४००००१
२.मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक